| MHAU110010252018 | दाखल तारीख | : | २५/०९/२०१८ |
|---|---|---|---|
| | नोंद तारीख | : | २५/०९/२०१८ |
| | निकाल तारीख | : | ०५/०८/२०२६ |
| | कालावधी | | **व.०७, म.१०, दि.११** |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २ फुलंब्री यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी श्री. चंद्रकांत रामचंद्र पाटील)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४३५/२०१८** **निशाणी क्र.२१/बी**

प्रथम खबरी अहवालाचे विवरण
गु.र.क्र.११२/२०१८ दि.३०/०४/२०१८
पोलीस ठाणे – वडोदबाजार, औरंगाबाद.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे, वडोदबाजार,<br>औरंगाबाद. |
| सरकारतर्फे विधीज्ञ | श्री. एल.डी.पागोरे |
| **आरोपी** | **विलास गंगाधर खेकाळे,**<br>वय — ३० वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. पेरजापुर, ता.भोकरदन, जि.जालना. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री.एस. ए. इंगळे / एस. व्ही. आरक |

## भाग — ब
## {फौजदारी आदेशीकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये}

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | ३०/०४/२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | | १५/०८/२०१८ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | २५/०९/२०१८ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | | १५/०९/२०२३ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | २०/११/२०२५ |
| युक्तीवाद दिनांक | | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०५/०८/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विलास गंगाधर खेकाळे | सी. आर. पी. सी. ४१ (अ)(१) प्रमाणे नोटीस दिली. | १५/०९/ २०२३ | मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई) | निर्दोष मुक्तता | --- | --- |

# भाग–क
# (निकालासोबत जोडलेले)
# न्यायनिर्णय

सदरहू खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला.

२. फिर्यादीतर्फे फिर्याद अशी की, दि.३०/०४/२०१७ रोजी १७.३० वाजेच्या सुमारास ते व इतर पोलीस कर्मचारी पेट्रोलींग करत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हॉटेल गजल येथे विदेशी दारुची चोरटी विक्री करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी हॉटेलच्या कॉन्टरवर बसलेला एक इसम त्यांना पाहुन पळुन गेला. त्यांनी पळुन गेलेल्या इसमाचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विलास गंगाधर खेकाळे असे सांगितले. त्यांनी पंचांसमक्ष हॉटेलच्या कॉन्टरवर झडती घेतली असता खालच्या कप्यामध्ये एक स्कुल बॅग मिळुन आली. पंचांसमक्ष स्कुल बॅंगची झडती घेतली असता त्यात

ऑफीसर चॉइस कंपनीचे ०६ प्लास्टीकची विदेशी १८० एम.एल. च्या बाटल्या व इम्पेएल ब्लु कंपनीचे ०३ विदेशी १८० एम.एल.ची दारुची बाटल्या मिळुन आल्या. सदर माल ताब्यात घेवुन पंचनामा केला व त्यापैकी एक ऑफीसर चॉईसची व एक इम्पेएल ब्लु कंपनीची सिलबंद बाटली राखुन ठेवली. सदर माल बाळगण्याचा परवाना आहे काय याबाबत विचारणा केली असता कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला कायदेशीर तक्रार दिली.

३. या तक्रारीवरून आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे वडोदबाजार, पोलीस ठाणेमध्ये गुन्हा रजिष्टर क्र.११२/२०१८ नोंदवण्यात आला. तपासकामी तपासीक अंमलदाराने साक्षीदारांचे जबाब नोंदवले, आरोपीविरूध्द पुरावा आढळून आल्याने, त्याचेविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षापात्र अपराधासाठी नि. क्र.११ कडे अपराधाचे विवरण (आरोप) निश्चीत करण्यात आले. त्यातील मजकूर त्यांना वाचून दाखवून तो मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला असता, आरोपीनी तो अमान्य करुन प्रकरण चालविण्याची विनंती केली.

५. अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, आरोपीविरुध्द दोषहार्य पुरावा अभिलेखावर आला नसल्याने त्यांच्याविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील मुद्दे माझे विचारासाठी घेण्यात आले व त्याखाली दिलेल्या कारणमिमांसे आधारे त्यावर निष्कर्ष नोंदवण्यात आले.

| अ. क्र. | मुद्दे | निर्णय |
|---|---|---|
| १. | आरोपी बेकायदेशीरपणे कोणताही परवाना नसतांना वर नमुद | |

| | | |
|---|---|---|
| | मुद्देमाल विदेशी दारुची विक्री करीत असतांना सदरहु मालासह मिळुन आला म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केल्याची बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही... |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

७. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एल. डी. पागोरे व आरोपीतर्फे वकील श्री.एस. ए. इंगळे / एस. व्ही. आरक यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र. १ करीता

८. सरकारपक्षातर्फे सा.क्र.१ सय्यद यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०२.०५.२०१८ रोजी त्यांना दोन बॉटल सी.ए. अहवालाकरीता पाठवण्यासाठी दिल्या होत्या. त्या १८० मिलीच्या ऑफीसर चॉईस आणि इम्पेरियल ब्ल्यु कंपनीच्या होत्या. त्या बॉटल सी.ए. ऑफीस औरंगाबाद येथे जमा केल्या. जमा करुन पोहोच पावती दाखल केली. आरोपीचे नाव विकास गंगाधर खेकाळे असे आहे.

९. सदर साक्षीदाराने सांगितले आहे की, सी.ए. अहवाल जमा करण्याबाबत पाटील मॅडम यांनी त्यांना कोणतेही पत्र दिले नव्हते, मुद्देमाल जमा करण्यासाठी जातांना त्यांची नोंद स्टेशन डायरीला केलेली आहे, त्यांना त्या स्टेशन डायरीचा नंबर सांगु शकत नाही, दोन बॉटलचा त्यांना बॅच क्रमांक सांगता येणार नाही, त्यांचे उत्पादन वर्ष व लॉट नंबरही त्यांना सांगता येणार नाही, तपासिक अधिकारी यांनी त्यांचे तपासटिपण याकामी नोंदवलेले नाही.

१०. याकामी फिर्यादी, पंच आणि तपासिक अधिकारी यांना वेळोवेळी समन्स काढुन देखील ते याकामी हजर राहिले नाही. जप्त मुद्देमाल कोणत्याही साक्षीदाराला दाखवला नाही. तसेच याकामी सी. ए. अहवाल दाखल आहे. दि.०१/०५/२०१८ रोजी मुद्देमाल जप्ती

केलेला असुन तो रासायनिक अहवालाकरीता दि.११/०५/२०१८ रोजी पाठविण्यात आलेला आहे. तसेच आरोपी यांच्याकडे कोणताही परवाना नसतांना ते दारू विकत होते ही बाब सिध्द झालेली नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरूध्द दोषारोप निर्विवादपणे सिध्द झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा आरोपीने गुन्हा केल्याचे शाबित करण्यास पुरेसा नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. २ करीता

११. फौजदारी कायद्याच्या तत्वानुसार आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्याची जबाबदारी फिर्यादी पक्षावरती आहे. प्रस्तुतच्या खटल्यामध्ये फिर्यादी पक्षातर्फे सादर करण्यात आलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता दि.३०/०४/२०१८ रोजी दुपारी १८.०० वाजेच्या सुमारास मौजे फरशी फाटयाच्या पुलाजवळ हॉटेल गजल येथे विहीत परवाना नसतांना बेकायदेशीररित्या विदेशी दारूची विक्री करत असल्याची बाब अभियोगपक्षाने संशयापलिकडे शाबीत केलेली नाही. याउलट, खटल्याच्या सुनावनी दरम्यान न्यायालयासमोर आलेल्या बाबी लक्षात घेता माझ्यामते आरोपीला संशयाचा फायदा देणे योग्य होईल. मुद्देमाल जप्त केल्याचे दिसून येते परंतू सदर मुद्देमाल न्यायालयामध्ये जमा नसल्याचे अभिलेखावरून स्पष्ट होते. त्याप्रमाणे मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | आरोपी **विलास गंगाधर खेकाळे** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करणेत येत आहे. |
| २. | आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करणेत येत आहे |
| ३. | जप्त मुद्देमाल म्हणजेच ऑफीसर चॉईस कंपनीच्या १८० मिलीच्या प्लास्टीकच्या ०६ |

| | |
|---|---|
| | बाटल्या व इम्पेएल ब्लु कंपनीच्या १८० मिलीच्या ०३ बाटल्या विदेशी दारु अपिल कालावधीनंतर दु. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, छ.संभाजीनगर यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकामी पाठविणेत यावा. |
| ४. | आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसार पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी र. रु.१०,०००/– चे वैयक्तीक जातमुचलक्यावर खुले करणेत येत आहे. त्यासाठी पंधरा दिवसांचा कालावधी आरोपीला देण्यात येतो. |

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.08.05 15:29:02 +0530

दि. ०५/०८/२०२६

**( चंद्रकांत रामचंद्र पाटील )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्या. क्र. २ फुलंब्री.**

**सोबत – जोडपत्र (भाग–क)**

**भाग – क**
**{फौजदारी आदेशीकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये}**
**सरकारपक्षातर्फे/बचावपक्षामार्फत/न्यायालयीन साक्षीदार**
**अभियोगपक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी**

| अ. क्र. | साक्षीदारांचे नाव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | सय्यद | १९ | साक्षीदार |

**सरकारपक्षातर्फे/बचावपक्षामार्फत/न्यायालयीन सिध्द झालेले दस्तऐवज**
**अभियोगपक्षातर्फे सिध्द झालेले दस्तऐवज**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २० | केमिकल ॲनालायझर यांचे पत्र |

**आरोपीतर्फे मान्य/सिध्द झालेले दस्तऐवज**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | |

**ड. मुद्देमाल**

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | |

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.08.05 15:29:07 +0530

**( चंद्रकांत रामचंद्र पाटील )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्या. क्र. २ फुलंब्री.**

दि. ०५/०८/२०२६

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***Komal M. Shinde*** |
| Court | : | Jt. Civil Judge Jr. Dn., & Judicial Magistrate F.C.,Phulambri. |
| Date of order | : | 05/08/2026 |
| Signed by the Presiding Officer on | : | 05/08/2026 |
| Order Uploaded on | : | 05/08/2026 |